**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २०/२०२५ मधील निशाणी १ वरील आदेश**

**(प्रशांत घोगळे वगैरे वि.कोणीही नाही )**

**सीएनआरनं.एमएचएसआय–०५–०००२१२२०२५**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मुंबई नियंत्रण अधिनियम, १८२७ चे कलम २ व ८ अन्वये त्यांचे नावे मयत सुभद्राबाई भिवा गावडे **(यापुढे "मयत सुभद्राबाई" असा उल्लेख)** यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुतकामी अर्जदार क्र. १ व २ हे मयत सुभद्राबाई यांचे चुलत पणतू व अर्जदार क्र. ३ व ४ या चुलत नाती आहेत. अर्जदार क्र. १ व २ यांचे आजोबा तेच अर्जदार क्र. ३ व ४ यांचे वडील कै.जयदेव यांची चुलती सुभद्राबाई गावडे हया दि. १६/०३/१९७० रोजी पेंडूर या गावी मयत झालेल्या आहेत. कै.सुभद्राबाई यांना कोणतेही अपत्य नव्हते व कै.जयदेव हे सुभद्राबाई यांचे सख्खे पुतणे असल्याने स्थावर मालमत्तेचे कायदेशीर वारस होते. कै.जयदेव यांच्या पश्चात अर्जदार क्र. १ व ४ हे कै.जयदेव यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत सुभद्राबाई अथवा त्यांचे पती कै.भिवा यांनी आपल्या पश्चात कोणतेही मृत्यूपत्र केलेले नाही. अर्जदार यांनी दि.०१/०६/२०२५ रोजी तलाठी कार्यालय येथे मयत सुभद्राबाई हिच्या पश्चात सातबारा सदरी वारस या नात्याने नोंद करण्यासंदर्भात अर्ज केला असता त्यांनी सक्षम न्यायालयातून वारस दाखला सादर करण्यास सांगितले. सबब, मयत सुभद्राबाई यांचे अर्जदार क्र. १ ते ४ हे कायदेशीर व सरळ वारस आहेत असा ठराव होवून वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार क्र. १ ते ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे व अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या व्यतिरिक्त मयत सुभद्राबाई यांचे दुसरे कोणी वारस आहे किंवा नाही हे जाणून घेण्याकरीता प्रस्तुतकामी अर्जदार यांच्यावतीने दि.१९/१०/२०२५ रोजी "दैनिक प्रहार" या वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात आली आहे. तसेच जाहीरनामा प्रसिध्द केल्याबाबतचा बेलिफ यांनी नि.क्र.०६ व नि.क्र.०८ प्रमाणे अहवाल दाखल केला असून सदर अहवालानुसार वेंगुर्ला तहसील कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर, ग्रामपंचायत पेंडूर यांच्या नोटीस बोर्डावर, दिवाणी न्यायालय क. स्तर, वेंगुर्ला यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व

मयताच्या घरावर लावून जाहीरनामा जाहीर केल्याचे दिसून येते.

४. अर्जदार यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्याचा अर्ज व सोबत दाखल कागदपत्रे यावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण होतात व त्यावरील निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत सुभद्राबाई यांचे वारस म्हणून त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळविण्यास पात्र आहेत का ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अर्ज मंजूर करणेत येतो. |

५. सदर अर्जाच्या पृष्ट्यर्थ अर्जदार यांनी अर्जदार क्र. १ प्रशांत यांचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी ११ येथे दाखल केले आहे. अर्जदार यांनी कागदोपत्री पुरावा म्हणून गाव मौजे पेंडूर, ता.वेंगुर्ला येथील सर्व्हे क्र.४७ हिस्सा क्र.२० (नि.४/२), सर्व्हे क्र.४७ हिस्सा क्र.२२ (नि.४/३), सर्व्हे क्र.४७ हिस्सा क्र.१९ (नि.४/४) या मिळकतींच्या सातबारा उताऱ्याची ऑनलाईन प्रती, तसेच गाव नमुना ८ अ उताऱ्याची मूळप्रत (नि.४/५), मयत सुभद्राबाई यांच्या मृत्यू दाखल्याची सत्यप्रत (नि.१४/१), मयत जयदेव यांचा मृत्यू दाखल्याची मूळप्रत (नि.१४/२), मयत कौशल्या यांचा मृत्यू दाखल्याची मूळप्रत (नि.१४/३), मयत सुशिला यांचा मृत्यू दाखल्याची मूळप्रत (नि.१४/४), दि.१९/११/२०२५ रोजी "दैनिक प्रहार " या वर्तमापत्रामध्ये जाहीर प्रगटन प्रसिध्द केले होते ते वर्तमानपत्र (नि.१०), अर्जदाराच्या कुटुंबाची वंशावळ (नि.१३), मयत सुभद्राबाई यांना त्यांचे पती भिवा यांच्या मृत्यूपश्चात मिळकत वारसा हक्काने हस्तांतरीत झाली या आशयाची अर्जदार क्र.१ यांचे प्रतिज्ञापत्र (नि.१६) इ. कागदपत्रे स्कॅन करुन दाखल केलेली आहेत. जाहीरनामा प्रसिध्द केल्याबाबतचा बेलिफ अहवाल नि.क्र.०६ व नि.क्र.०८ येथे दाखल आहे. तसेच अर्जदार यांनी प्रस्तुतकामी ज्यादा पुरावा देण्याचा नाही अशी नि. क्र. १२ वर पुरशीस दाखल करुन या कामी पुरावा बंद केला आहे.

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ व २ करीता :–**

६. अर्जदार यांनी अर्जातील कथनांचे पृष्टयर्थ व त्यांचे नावे वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार क्र.१ प्रशांत यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.११ वर दाखल केले आहे.

सदर शपथपत्रातील कथनानुसार सुभद्राबाई हया दिनांक १६/०३/१९७० रोजी मौजे–मातोंड पेंडूर ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग येथे मयत झालेल्या आहेत. मयत सुभद्राबाई यांच्या पश्चात त्यांना अर्जदार क्र. १ ते ४ हेच सरळ व कायदेशीर वारस हयात आहे व त्याच्या व्यतिरिक्त त्यांना अन्य कोणीही वारस नाही.

७. सदर प्रकरणात "दैनिक प्रहार " या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस तसेच जाहीर प्रगटन बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्द करुन हरकती मागविण्यात आलेल्या होत्या, परंतु सदर नोटीस व जाहीरनामा प्रसिध्द झाल्यानंतर मुदतीत अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारसाप्रमाणपत्र देण्याबाबत कोणीही हरकत नोंदविली नाही. तसेच प्रस्तुतकामी अर्जदार क्र. १ ते ४ यांच्याव्यतिरिक्त अन्य कोणीही मयत सुभद्राबाई यांचे वारस असल्याबाबत अथवा अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत सुभद्राबाई यांचे वारस नसल्याबाबतचा आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदार क्र. १ प्रशांत यांचा शपथेवरील जबाब व प्रकरणातील कागदपत्रे ही प्रस्तुत प्रकरणात कोणीही आक्षेप घेतला नसल्यामुळे शाबीत झालेली आहेत. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सुभद्राबाई यांचा दिनांक १६/०३/१९७० रोजी मृत्यू झालेला आहे. तसेच अर्जदार क्र. १ प्रशांत यांच्या अर्जातील कथने व दाखल कागदोपत्री पुराव्यावरुन अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत सुभद्राबाई यांचे वारस असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. मुंबई नियंत्रण अधिनियम, १८२७ अंतर्गत दाखल प्रकरणामध्ये देण्यात येणारे वारसा प्रमाणपत्र हे वारस या स्थितीची औपचारीक ओळख (Formal Recognition) म्हणून देण्यात येते. प्रस्तुतकामी वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचीही हरकत नसल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे व वरील सर्व कारणास्तव अर्जदार क्र. १ ते ४ यांना वरील कायद्यांतर्गत वारसा प्रमाणपत्र देणे न्यायाच्या दृष्टीने उचित आहे. करीता मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. २ करीता खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ प्रशांत चंद्रकांत घोगळे, अर्जदार क्र. २ मुकेश चंद्रकांत घोगळे, अर्जदार क्र. ३ प्रभावती लवू ठाकूर व अर्जदार क्र. ४ उषा प्रकाश पडते हे मयत सुभद्राबाई भिवा गावडे यांचे वारस ही औपचारीक ओळख म्हणून सदर वारस प्रमाणपत्र अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या नावे योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन देण्यात यावे.

३. वारस प्रमाणपत्रावर दिवाणी नियम पुस्तिका परिच्छेद ३१२ मधील नमूद निर्देशांची नोंद घेण्यात यावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE
Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2026.06.11 17:55:32 +0530

स्थळ – वेंगुर्ला
दिनांक –११/०६/२०२६

**(एस.जे. चिवटे)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
वेंगुर्ला.